सर्वांसाठी घरे २०२२ या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागातील शासकिय जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याच्या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : प्रआयो-२०१८/प्र.क्र.२५६/योजना-१०
बांधकाम भवन, २५, मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.
तारीख: २० ऑगस्ट, २०१८

वाचा :-

शासन निर्णय क्रमांकः ग्राम विकास विभाग, प्रआयो-२०१७/प्र.क्र.३४८/योजना-१०, दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८.

प्रस्तावना :-

सर्वांसाठी घरे या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना अतिक्रमित जागा निवासासाठी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय संदर्भाधीन शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. त्यानुसार राज्यातील शासकिय जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबतचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. या धोरणांतर्गत राज्यातील शासकिय जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना संदर्भाधीन शासन निर्णयातील परिशिष्ट-क मध्ये देण्यात आलेल्या आहेत. या मार्गदर्शक सुचनांनुसार या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्वकष कार्यपध्दती विहीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक:-

सर्वांसाठी घरे-२०२२ या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागातील केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांच्या लाभार्थ्यांना त्यानी केलेल्या अतिक्रमीत जागा निवासासाठी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय संदर्भाधीन शासन निर्णयान्वये घेण्यात आला. सदर शासन निर्णयान्वये घेण्यात आलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत :-

१) ग्रामसेवकाने,सन १९९९-२०००, २०१०-२०११ व सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाचे ग्रामपंचायतीमधील नमुना नं.८ (कर आकारणी नोंदवही), या नोंदवहीच्या प्रती आपले सरकार सेवा केंद्राच्या केंद्रचालकांमार्फत Scan करून घेऊन Scan केलेल्या प्रती ऑनलाईन प्रमाणित कराव्या. व सदर नमुना नं.८ (कर आकारणी नोंदवही) ही नोंदवही गट विकास अधिकारी यांचे ताब्यात द्यावी.

Scanned by CamScanner

२) या प्रतीतील नोंदीप्रमाणे ज्या मालमत्ता धारकांच्या नावापुढे सरकारी अतिक्रमण असल्याची नोंद आहे अशाच मालमत्तांची ग्रामसेवकाने खातरजमा करुन त्या नोंदीची माहिती सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मधील विवरणपत्रामध्ये भरावी. सदर माहितीस ग्रामसेवकाने प्रमाणित करावे.

३) विस्तार अधिकारी यांनी काटेकोरपणे तपासून "तपासले" म्हणून प्रत्येक विवरणपत्र प्रमाणित करावे व सदर विवरणपत्र ग्रामसेवकाकडे परत देऊन त्याची एक प्रत पंचायत समिती कार्यालयात ठेवावी.

४) ग्रामसेवक व विस्तार अधिकारी यांनी प्रमाणीत केलेले विवरणपत्र केंद्रचालकाकडे स्कॅन करून अतिक्रमण नियमानुकूल संगणक प्रणालीवर अपलोड करण्यासाठी व डेटाइन्ट्रीसाठी द्यावेत. केंद्र चालकांनी वरीलप्रमाणे विस्तार अधिकारी व ग्रामसेवकाने प्रमाणित केलेल्या विवरणपत्रानुसार अतिक्रमण धारकाची माहिती संगणक प्रणालीवर नोंदवावी.

५) सदर माहिती विस्तार अधिकारी व ग्रामसेवक यांनी प्रमाणीत केल्यानुसारच केंद्रचालकांने डेटाइन्ट्री केली असल्याची व डेटाइन्ट्री करतांना एकही मालमत्ता धारक वगळला गेला नसल्याची खात्री ग्रामसेवकांने करावी व तसे ऑनलाईन प्रमाणित करावे.

६) संगणक प्रणालीद्वारे संदर्भीत शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या बाबीनुसार पात्र अपात्र लाभार्थ्यांची यादी अंतीम करण्यात येईल. तसेच ग्रामसेवकाने ही यादी ग्रामपंचायतीच्या ठळक जागी/ दर्शनी भागात व ग्रामपंचायतींशी संबंधीत वेबसाईटवर लावून व्यापक प्रसिध्दी द्यावी.

७) एखाद्या ग्रामपंचायत क्षेत्रात एकही शासकीय अतिक्रमित जागा नसल्यास तसे प्रमाणित करुन त्याची व्यापक प्रसिद्धी ग्रामसेवकाने मुद्या क्र.५ व ६ मध्ये नमूद केल्यानुसार करावी.

८) वरीलप्रमाणे कार्यवाही केल्यानंतर गावातील अतिक्रमीत जागांबाबतची यादी ग्रामसभेमध्ये प्रसिध्द करण्यात यावी.

९) या यादीवर आक्षेप/सूचना नोंदविण्यासाठी १५ दिवसांची मुदत द्यावी. सदर आक्षेप/सूचना या लेखी स्वरुपात ग्रामसेवक / ग्रामपंचायतीकडे देण्याबाबत सूचीत करावे. ग्रामसेवकांनी केंद्र चालकाद्वारे सदर आक्षेप/सूचना या संगणक प्रणालीवर नोंदवून त्याची प्रत अपलोड करून संबंधितांस द्यावी व त्याची पोच जपून ठेवावी. गावामधील ज्या अतिक्रमणाबाबत कोणताच आक्षेप नाही व ग्रामसभेने त्यास मान्यता दिलेली असल्यास अशा अतिक्रमणाची

Scanned by CamScanner

नोंद संगणक प्रणालीवर घेण्यात यावी. व या यादीस ग्रामसेवकाने ऑनलाईन प्रमाणित करावे.

१०) सर्वसाधारणपणे पुढीलप्रमाणे आक्षेप प्राप्त होण्याची शक्यता आहे. १) अतिक्रमण धारकाचे नाव चुकीचे आहे. २) अतिक्रमणाचे वर्ष चुकीचे आहे. ३) अतिक्रमणाचे क्षेत्रफळ चुकीचे आहे. ४) अतिक्रमणाची नोंद नाही. तसेच, पुढीलप्रमाणे सूचना प्राप्त होण्याची शक्यता आहे. १) अतिक्रमण आहे त्या ठिकाणीच नियमानुकूल करणे (In-situ). २) अतिक्रमण आहे त्या ठिकाणीच परंतु, जागेच्या विहीत आराखड्यानुसार (In-situ with layout) नियमानुकूल करावे. ३) अतिक्रमण धारकाचे पर्यायी जागेवर पुनर्वसन करावे (Ex-situ).

११) वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या आक्षेपात "अतिक्रमणाची नोंद नाही" या स्वरूपाचा आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची शहनिशा करून ग्रामसेवकाने प्रथम अशा अतिक्रमणाची चालू वर्षाच्या नमूना नं. ८ या नोंदवहीमध्ये शासन निर्णय ग्रामविकास विभाग दिनांक १८ जुलै, २०१६ या शासन निर्णयाप्रमाणे सर्वप्रथम नोंद घ्यावी. या नमूना नं. ८ नोंदवहीतील संबंधित पृष्ठ Scan करावे व त्याची विवरणपत्र अ मध्ये नोंद घेऊन संगणक प्रणालीवर अपलोड करावे. व त्यास ग्रामसेवकाने प्रमाणित करावे. चालू वर्षाच्या नमूना नं. ८ या नोंदवहीमध्ये अतिक्रमणाची नोंद नसल्यास कोणत्याही परिस्थितीत पुढील कार्यवाही होऊ शकणार नाही.

१२) प्राप्त झालेले आक्षेप तालुका स्तरावरील शक्ती प्रदत्त समितीकडे सादर करण्यात यावेत. या समितीने संबंधितांची सुनावणी घेऊन त्याबाबतचा निर्णय दिल्यानंतर या निर्णयाची तपशीलवार नोंद केंद्रचालकाद्वारे संगणकीय प्रणालीवर घ्यावी. व या नोंदीस ग्रामसेवकाने ऑनलाईन प्रमाणित करावे.

१३) उपरोक्त परिच्छेद १० मध्ये नमूद केल्याप्रमाणे जर काही सूचना (क्रमांक १, २ किंवा ३) प्राप्त झाल्यास या सूचनांचा सखोल अभ्यास करून त्या ग्रामपंचायतीने आपल्या अभिप्रायासह ग्रामसभेसमोर सादर कराव्या. या तिन्हीपैकी कोणता पर्याय निवडायचा आहे याबद्दल अंतिम निर्णय घ्यावा. हा निर्णय संगणकीय प्रणालीवर अपलोड करून तो ग्रामसेवकाने प्रमाणित करावा. जर कोणतीही सूचना प्राप्त झाली नसल्यास तरीसुध्दा ग्रामपंचायतीच्या अभिप्रायानुसार ग्रामसभा वरील परिच्छेद १० मध्ये नमूद १, २ किंवा ३ या पर्यायांबद्दल निर्णय घेईल.

१४) आहे त्या जागेवर (In-situ) अतिक्रमण (आराखडा किंवा आराखड्याशिवाय) नियमानुकूल करताना, नियमानुकूल करावयाच्या अतिक्रमीत जागांची संगणकीकृत यादी शासकीय



Scanned by CamScanner

जमीनीच्या मालकीनुसार समितीकडून ग्रामसेवकास जशी-जशी प्राप्त होईल त्यानुसार वेळोवेळी संबंधित विभागाला पाठविण्यात यावी.

१५) संबंधित अधिकाऱ्याची मान्यता प्राप्त झाल्यानंतर मान्यतेचे आदेश केंद्रचालकाद्वारे Scan करून Upload करावे. सदर नोंदीस ग्रामसेवकाने ऑनलाईन प्रमाणित करावे. संगणकीय प्रणालीद्वारे अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठी लागणाऱ्या शुल्काचे मागणीपत्र संगणक प्रणालीद्वारे प्रत काढून संबंधितांना बजावण्यात येईल. अतिक्रमणधारकाद्वारे या शुल्काचा भरणा झाल्यानंतर अतिक्रमण नियमानुकूल करण्याबाबतच्या आदेशाची संगणकीय प्रणालीद्वारे प्रत (प्रिंट) काढण्यात येऊन ग्रामसेवकाच्या व विस्तार अधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीने हा आदेश अतिक्रमणधारकास देण्यात यावा व ग्रामपंचायतीच्या नमुना नं.८ मधील कर आकारणी नोंदवहीमध्ये याबाबतची नोंद घेऊन त्यात दुरुस्ती करण्यात यावी. व याबाबतची माहिती पुढील ग्रामसभेमध्ये ठेवण्यात यावी.

१६) वरील सूचनांची अंमलबजावणी ही योग्य प्रकारे होईल याची सर्वतोपरी दक्षता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी घ्यावी व याबाबतचा अहवाल संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण, बेलापूर, नवी मुंबई यांना व विभागीय आयुक्त कार्यालयास सादर करावा.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेताक २०१८०८२०१५१८४१४६२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(असीम गुप्ता)
सचिव, ग्राम विकास विभाग

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव.

२) मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव.



Scanned by CamScanner

# परिशिष्ट-अ

## विवरणपत्र

## अतिक्रमणधारकाची प्रपत्रात भरावयाची माहिती

| | | |
|---|---|---|
| ग्रामपंचायतीचे नांव:- | | |
| गावाचे नांव:- | | |
| अतिक्रमणाचे ठिकाण:- | अतिक्रमण गावठाणामध्ये आहे ☐ | अतिक्रमण गावठाणामध्ये नाही ☐ |
| | भुमापन क्रमांक/सिटी सर्वे क्रमांक असल्यास - | भुमापन क्रमांक |

| | | | |
|---|---|---|---|
| १) अतिक्रमण धारकाची माहिती:- | | | |
| लिंग:- | ☐ पुरूष | ☐ स्त्री | ☐ इतर |
| अतिक्रमण करणाऱ्याचे आडनाव:- | | | |
| अतिक्रमण करणाऱ्याचे प्रथम नाव:- | | | |
| अतिक्रमण करणाऱ्याच्या वडिलांचे/पतीचे नाव:- | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| जमिनीचा प्रकार | ☐ गायरान | ☐ गावठाण | ☐ सार्वजनिक वापराची जमिन | ☐ प्रशासकीय विभागाची जमिन असल्यास विभागाचे नाव |
| प्रचलित वर्षाचा जमिनीचा दर (चौ.फु.):- | | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| २) नमुना नं.८ प्रमाणे मालमत्तेची माहिती | | | |
| वर्ष:- | २०१८-२०१९ | २०१०-२०११ | १९९९-२००० |
| १) अतिक्रमित घराचा मिळकत क्रमांक: | | | |
| २) अतिक्रमण क्षेत्र लांबी (फुट):- | | | |
| ३) अतिक्रमण क्षेत्र रूंदी (फुट):- | | | |
| ४) एकूण क्षेत्रफळ (चौ.फु.):- (लांबी x रुंदी) | | | |
| ५) अतिक्रमित जमिनीचा निवासी उपयोग क्षेत्रफळ (चौ.फु.):- | | | |
| ६) अतिक्रमित जमिनीचा व्यावसायीक उपयोग क्षेत्रफळ (चौ.फु.):- | | | |
| ७) अतिक्रमित जमिनीचा औद्योगीक उपयोग क्षेत्रफळ (चौ.फु.):- | | | |



Scanned by CamScanner

| ३) अतिक्रमित कुटूंबातील व्यक्तीच्या घराची माहिती | | | |
|---|---|---|---|
| अतिक्रमित कुटूंबातील व्यक्तीचे नावे ग्रामपंचायत क्षेत्रात घर आहे/नाही (कुटूंबातील एकापेक्षा जास्त व्यक्तीच्या नावे घर असल्यास अशा प्रत्येक घराचा तपशील द्यावा):- | | | |
| लिंग:- | ☐ पुरूष | ☐ स्त्री | ☐ इतर |
| अतिक्रमण करणाऱ्याचे नाव | आडनाव | प्रथमनाव | वडिलांचे/पतीचे नाव |
| अतिक्रमित कुटूंबातील सदस्याच्या घराचा मिळकत क्रमांक:- | | | |

टिप- १) ज्या वर्षासाठी अतिक्रमण आहे अशा प्रत्येक वर्षासाठी स्वतंत्र विवरणपत्राची नोंद संगणक प्रणालीवर करण्यात यावी.

२) उपरोक्त भाग २ मधील अ.क्र.५ ते ७ येथील क्षेत्रफळ एकूण क्षेत्रफळापेक्षा अधिक असणार नाही.

स्वाक्षरी:-
नाव:-
पदनाम:-
दिनांक:-

स्वाक्षरी:-
नाव:-
पदनाम:-
दिनांक:-

Scanned by CamScanner